लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा,
भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६४७२७८७/२६४७०१४६
Website-http://ecourt.gov.in/small-causes
ई–मेल : scc-bandra@bhc.gov.in

# जाहीर निविदा

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, मुंबई – ४०० ०५१ या कार्यालयात **अंतर्गत दुरध्वनी यंत्रणा (EPABX SYSTEM)** मशीन हे मॅट्रिक्स कंपनीचे असून सदर यंत्रणेचा **वार्षिक देखभाल करार (AMC)** सन २०२४–२०२५ या एक वर्ष कालावधीसाठी करणे असून मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

तरी इच्छुक खाजगी व शासकीय संस्था/कंपन्यांनी आपले दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात, त्या लिफाफ्याच्या वरच्या बाजुस मोठ्या अक्षरात **'मॅट्रिक्स कंपनीच्या EPABX SYSTEM वार्षिक देखभाल करार (AMC)** असे लिहून ते 'अप्पर प्रबंधक, लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा, भास्कर इमारत, अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व) मुंबई – ४०० ०५१' यांच्याकडे **सोमवार, दिनांक २४ जून, २०२४ रोजी, दुपारी ४:००** वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

तसेच दरपत्रके स्वीकारण्याचा वा रद्द करण्याचा तसेच या प्रक्रियेसंबंधातील सर्व अधिकार मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय मुंबई यांच्या अधिन राहतील.

14/06/2024

लघुवाद न्यायालय, वांद्रे, मुंबई }
}
मुंबई : १४ जून, २०२४ }

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक
**लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा**

लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा,
भास्कर इमारत, अनंत कानेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दूरध्वनी क्र. ०२२-२६४७२७८७/२६४७०१४६
Website-http://ecourt.gov.in/small-causes
ई—मेल : scc-bandra@bhc.gov.in


## मॅट्रिक्स कंपनीच्या ईपीएबीएक्स मशीन (EPABX SYSTEM) चा वार्षिक देखभाल करार (AMC) करण्यासंदर्भातील अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. | EPABX SYSTEM मशीन देखभाल व दूरुस्तीचा करार कालावधी हा एक वर्षासाठी असणार. |
| २. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने/कंपनीने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षाच्या साक्षांकीत छायाप्रती, सेवाकर प्रमाणपत्राची छायाप्रत, पॅन कार्ड, जी. एस. टी. क्रमांक इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकीत छायाप्रती दरपत्रकांसोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ३. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्था/कंपनीचा पत्रव्यवहाराचा पुर्ण पत्ता, ई—मेल आयडी, दुरध्वनी आणि भ्रमणध्वनी क्रमांक दरपत्रक पाकिटावर नमूद करावे. |
| ४. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने/कंपनीने यापूर्वी ज्या ठिकाणी सेवा दिली आहे त्याबाबतचे सेवा प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| ५. | कराराच्या कालावधीतील एका वर्षाकरिता आपण कोणकोणत्या सुविधा वा सेवा प्रदान करणार आहात त्याचा तपशील/अहवाल दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ६. | ज्या संस्था/कंपनीचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी १० दिवसांच्या आत ईपीएबीएक्स मशीनचे परीक्षण करणे आवश्यक आहे. |
| ७. | ईपीएबीएक्स मशीनसंदर्भातील तक्रारीबाबत कार्यालयाद्वारे संपर्क केला असता त्वरीत त्या तक्रारीची दखल घेणे आवश्यक आहे. |
| ८. | दरपत्रकातील दरांव्यतिरिक्त कोणत्या सेवांसाठी अतिरिक्त शुल्क आकारले जाईल का आणि कसे याची माहिती देणे.<br>जसे की Extensions Numbers Shift करणे इत्यादी. |
| ९. | दरपत्रकातील दराची रक्कम सर्व करांसहीत (GST) नमूद करावी. तसेच सर्व करांची रक्कम तपशीलवार नमूद करावी. |
| १०. | दरपत्रकधारकाचे/संस्थेचे देयक पारित करण्यासाठी अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई येथे पाठविण्यात येईल व ते मंजूर झाल्यानंतरच दरपत्रकाधाराकाला रक्कम धनादेशाद्वारे अदा करण्यात येईल. |
| ११. | मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना दरपत्रकात अथवा सोबतच्या कागदपत्रात काही त्रुटी आढळल्यास सदरचे दरपत्रक रद्द करण्याचे पूर्ण अधिकार राहतील. |

| | |
|---|---|
| १२. | ज्या दरपत्रकधारक संस्था/कंपनीचे दरपत्रक मंजूर होईल त्यांनी पत्रकातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे आणि त्यांचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे. |
| १३. | मा. मुख्य न्यायाधीश लघुवाद न्यायालय, मुंबई यांनी घेतलेले निर्णय अंतिम राहतील. |

लघुवाद न्यायालय, वांद्रे, मुंबई }
}
मुंबई : १४ जून, २०२४ }

(आर. के. कुळकर्णी)
अप्पर प्रबंधक
**लघुवाद न्यायालय, वांद्रे शाखा**